impact
www.impactmeasurement.co.in

Loksatta

Mumbai - Mar 20, 2018

| | | | |
|---|---|---|---|
| Page No: | 10 | Type: | Newspaper |
| Page Name: | n.a. | Language: | Marathi |
| Size: | 107 sq. cm | Circulation: | 218,315 |
| AVE: | INR 330,387 | Frequency: | Daily |

News monitored for: Lemon Tree Hotels
Title: Lemon Tree to raise Rs 1000 crore via IPO, open 28 new hotels

# लेमन ट्री हॉटेल्सची भागविक्री प्रक्रिया

## कंपनी १,०४० कोटी रुपये उभारणार

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**आदरातिथ्य क्षेत्रातील** आघाडीच्या लेमन ट्री हॉटेल्स लिमिटेडमार्फत प्रारंभिक खुली भागविक्री प्रक्रिया राबविण्यात येणार असून यामार्फत १,०४० कोटी रुपये उभारले जातील.

२६ ते २८ मार्च २०१८ पर्यंत याबाबतची प्रक्रिया होणार आहे. प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या प्रति समभागाकरिता किंमतपट्टा ५४ ते ५६ रुपये निश्चित करण्यात आला आहे. दर्शनी मूल्यापेक्षा ५.४ पट अधिक फ्लोअर प्राइस व दर्शनी मूल्यापेक्षा ५.६ पट अधिक कॅप प्राइस निर्धारित आहे. किमान बोलीचे प्रमाण २६५ समभाग आहे आणि त्यानंतर २६५ समभाग पटीत असेल. कंपनीच्या या प्रारंभिक खुल्या भागविक्रीच्या प्रक्रियेची घोषणा लेमन ट्री हॉटेल्सचे मुख्य वित्तीय अधिकारी कपिल शर्मा, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पतंजली केसवाणी यांनी सोमवारी केली.



प्रारंभिक भागविक्रीच्या घोषणेप्रसंगी कपिल शर्मा व पतंजली केसवाणी.



© Loksatta www.loksatta.com